

# राहूल - एक परिवार - एक प्रवास

श्री. बाजीराव थोरवे
सचिव
BCom.CAIIB.

मागे वळून पहाताना मला आठवण होते ती १९७२ सालची जेव्हा मी गावाहून नोकरीसाठी मुबंईला आलो होतो. तेव्हा आम्ही शिरोलीकर मित्र मंडळी ''नवजान सेवा संघ'' किंवा भैरवनाथ नाट्य निकेतन च्या विविध कार्यक्रमानिमित्ताने राणीबागेतल्या हिरवळीवर एकत्र जमत असायचो गुढीपाढव्याच्या उत्सवासाठी शिरोलीत भैरवनाथाच्या वार्षिक यात्रोउत्सवात सहभाग घेण्याकरीता चर्चा होत असायची आणि सर्वजण हसतखेळत आनंदाने एखाद्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेत असत.

त्यावेळी आम्हाला श्री शांताराम ढगे,कै. बन्सीशेठ रोकडे, कै. कारभारीशेठ राऊत,कै. लक्ष्मण बोचरे, श्री करीमभाई इनामदार,श्री रामचंद्र ताजणे,श्री परमानंद राऊत, श्री पांडुरंगदादा थोरवे ही मंडळी मार्गदर्शन करायची. त्यातूनच ११ जणांनी आर्थिक गरजेपोटी विजयानंद फंडाची सुरुवात केली. त्यामध्ये आमचे संस्थापक श्री शंकरराव भुजबळशेठ, श्री सहादूशेठ शेरकर,श्री विश्वास शेरकर,श्री बन्सी राऊत,कै.राजाराम थोरवे, श्री जयराम थोरवे, श्री सिताराम थोरवे, श्री राजाराम शेरकर, श्री कोंडाजी थोरवे,श्री.रामचंद्र ताजणे, कै. बबन बोचरे इ. मंडळीनी हिरीरीने सहभाग घेतला. पुढे१९७६ च्या दरम्यान फंडाची वाढकरण्याच्या हेतूने ११ जणांनी आणखीन ११ जण शिरोलीकरांना त्या फंडात सामावून घेतले.आणि त्यातूनच जुन्नर तालुक्याच्या विकासाचे स्वप्न पहाणाऱ्या आदरनिय निवृत्तीशेठ शेरकर यांच्या ''विघ्नहर सरकारी साखर कारखाना'' करीता २२ जणांचे एकत्रित २२ शेअर्सची रक्कम शेठ बाबांच्या हवाली करुन विघ्नहर साखर कारखान्यांच्या उभारणीत सक्रीय सहभाग घेतला.

हे सर्व होत असताना मी या सर्वांमध्ये नवखा होतो.परंतु त्यांची एकत्र राहून काहीतरी सामाजिक दृष्टी ठेवून समाजाच्या हिताची धडपड पहात असायचो. त्यानंतर सदर फंडाचा उपयोग सर्व शिरोलीकरांना व्हावा या हेतूने त्या फंडाचे रुपांतर नवजवान फंड असे करण्यात आले.आणि सर्व फंडाचे सदस्यत्व खुले करुन इच्छा शक्तीनुसार समभाग देण्याचे ठरले आणि त्यानंतर नवजवान फंडाची मासीक बैठक भुलेश्वर येथे श्री. सहादूशेठ शेरकर यांच्या दुकानावर होऊ लागली.आजही आम्ही सर्वजन प्रत्येक महिन्याच्या १२ तारखेला भेटत असतो. बैठकीत नियमीत २५/३० सभासद सहभाग होऊ लागले. विचारांची देवाणघेवाण होऊ लागली. फंडाची आर्थिक उलाढाल वाढली.आणि त्याच सुमारास जुन्नर-आंबेगाव मुंबईकरांची शान असलेली ''मराठा बँक'' तसेच तत्कालीन पतसंस्था अस्थिर होऊ लागल्या. सहकारची उणीव व गरज जाणवू लागली. त्या सुमारास जुन्नर-आंबेगावच्या मुंबईकरांनी पर्यायी संस्थांची चाचपणी सुरु केली होती आणि त्यातून विशाल जुन्नर, कुलस्वामी, पुष्पांजली, साईप्रेरणा, विघ्नहर, यशोमंदीर इत्यादी पतसंस्था विविध कार्यकर्त्यांच्या गटागटांनी स्थापन केल्या.

या सर्व घडामोडीत नवजवान सेवा संघ शांत बसू शकला नाही. आणि नवजवान फंडाच्या माध्यमातून भूलेश्वर येथे आपली स्वतंत्र पतसंस्था असावी याबाबत चर्चा व विचारविनिमय चालू झाला. अथक प्रयत्नातून, उलटसुलट चर्चा झाल्यानंतर सर्वांनी एकमताने ठराव करुन पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय १९८८ साली घेतला.

श्री शंकरराव भुजबळशेठ, श्री सहादूशेठ शेरकर, श्री विश्वास शेरकर, श्री बन्सी राऊत आणि आमचे मुंबईतील स्नेही श्री. दिनेशभाई नाईक, श्री. दिनेश लवाणाशेठ, श्री कुटे, श्री हरिश्चंद्र वाणी, सुर्यकांत आळेकर, श्रीमती सुलोचना आळेकर यांना बरोबर घेऊन श्री गणेश जाधव या सहकारातील जाणकारांची मदत घेऊन त्यांच्या विशेष प्रयत्नातून आणि सहभागातून राहूल पतसंस्थेची १९८९ साली नोंदणी झाली.

३१ मार्च १९९० रोजी मा. निवृत्तीशेठ शेरकर यांच्या आशिर्वादाने आणि मार्गदर्शनाखाली सहकार मंत्री मा. विलासराव देशमुख त्यावेळचे आंबेगावचे आमदार मा. दिलिप वळसे पाटील, आमदार मा. बी. डी. झुटे अण्णा प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात भायखळा येथे श्री. दिनेशभाई नाईक यांच्या मालकीच्या जागेत सहकाराची मुहुर्तमेढरोवली. त्यावेळी शिरोली गावचे ग्रामस्थ व सभासद मोठ्या संख्यने हजर होते.

आज रौप्यमहोत्सव साजरा होत असताना मला त्याची विशेष आठवण झाल्याशिवाय राहत नाही. मी त्या काळामध्ये स्टेट बँक इंडियामध्ये कॅशिअर-क्लार्क-गोडाऊनकीपर अशा विविध पदावर मुंबईत काम करीत होतो. आणि १९८८ साली अधिकारी परीक्षा पास होऊन १९८९ मध्ये स्टेट बँकेत अधिकारी पदावर काम करण्यास सुरुवात केलेली होती. या सर्व मंडळीच्या धडपडीमध्ये एक सहकारी भागधारक म्हणूनच त्यांचे समवेत कुतुहलाने त्यांच्या प्रमाणिक प्रयत्नांचे अवलोकन करीत होतो.

संस्थेला सुरुवातीपासूनच चांगला, उमदा, सच्चा, प्रामाणिक व नित्तीमान कर्मचारी वर्ग लाभला. हे संस्थेचे भाग्य होय. त्यामध्ये आजचे मुंबई जिल्हा बँकेचे संचालक व बँकेचे उपाध्यक्ष पद भूषविलेले आमचे सहकारी श्री नितिन बनकर साहेब यांनी हिरिरीने भाग घेतला. सहकारामध्ये आपला ठसा उमटविण्याच्या उमेदीने त्यांनी राहूलच्या भरभराटीच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले आणि संस्थेच्या सात शाखांच्या परवानग्या मिळविल्या. संस्थेच्या कारभाराची सात रोपटी लावून त्यांची जोपासना करण्याचे महाकठीण कार्य केले. त्यामध्ये त्यांचे सहकारी आपले आजचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र चौधरी साहेब श्री. पिसाळ साहेब श्री. संतोष चिखले, श्री. अविनाश शेरकर, श्री. संतोष पुरळकर, श्री. गणेश चौरे श्री. गणेश चौधरी,श्री.समीर भास्कर, श्री. योगेश घोगरे, श्री.नंदकुमार माने,श्री.सरोदे, कै.काळे, श्री.गायकवाड, श्री.संत(निवृत्ती), श्री.मंगेश भास्कर, श्री.अमोल वायकर या सुरुवातीच्या कर्मचाऱ्यांनी त्यांनाअहोरात्र साथ देऊन संस्थेचा वृक्ष वाढविण्यासाठी व टवटवीत ठेवण्यासाठी मेहनत घेतली.

त्या काळात मला माझ्या बँकेतील नोकरीच्या निमित्ताने मुंबईत व मुंबई बाहेर विविध शाखामध्ये विविध जबाबदरीची कामे करावी लागत.माझे परममित्र कै.राजाराम थोरवे ह्यांनी मी संस्थेत सक्रिय सहभाग घ्यावा म्हणून संचालक मंडाळकडे आग्रह धरला. पंरतु नोकरीच्या स्वरुपामुळे मला तो स्विकारता आला नाही. पंरतु त्यांच्या विनंतीमूळे मी वेळ मिळेल तसा सल्लागाराप्रमाणे काही सूचना सूचवू लागलो.काही काळानंतर सर्व संचालकानी मला सन्मानाने प्रमुख सल्लागार पद बहाल केले.त्यामुळे संचालकासमावेत संस्थेच्या ध्येय धोरणाबद्दल चर्चा करु लागलो.

मी या सहकारात घडत असताना आज मला माझ्या आई-वडिलांची आठवण येते. आईची अपार कष्ट करण्याची तयारी, सोशिकता, सहनशीलता, पतिस व मुलांना समजून घेण्याची क्षमता, त्यांच्या इच्छा आशा, आकांक्षा जोपासण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि वडीलांची ,त्यासाठी संघर्ष करण्याची जिद्द, अन्यायाविरुद्ध लढण्याची बेडर प्रवृत्ती, यांचे अनुकरण करता करता आपण कोण होतो आणि कोण झालो आहोत. यावर आज विश्वासच बसत नाही. एकदा आईशी हुज्जत घालून शापाची भिती दाखविण्याच्या "मरी आईवाल्याला" चाबकाने झोडपलेले पाहुन शेजाऱ्यांनी दारे बंद केली आणि आईसह आम्ही भावंडे रडू लागलो. आईला धमक्या देऊन धान्याची वसुली करणारे २/३कमान पुरुष २/३ कमान स्त्रिया यांना घराबाहेर पडलेल्या बाभळीच्या नाळाने फटकावून पळून लावणारे माझे वडिल शिस्तीचे प्रिय होते.आम्ही अर्धलिने करणाऱ्या शेतात दारुचे पिंप लावून बेकायदा दारु निर्मितीचा व्यवसाय करणारे स्थानिक लमाण जेव्हा वडिलांनी त्यांचे पिंप त्यांच्या मुलांनी का उलथावून दिले. म्हणुन विचारणा करण्यास माझ्या घरी आले तेव्हा त्यांच्या कानफाडात मारुन त्याला एकाच फटक्यात जमिनीवर लोळावणारे माझे वडील माझा सदैव आर्दश राहीले.

या सर्व पार्श्वभूमीवर मी २०१०साली भारतीय स्टेट बँकेतून सेवानिवृत्ती घेतली.आणि माझ्या सर्व मित्रांनी मला सन्मानाने त्यांच्या समवेत राहूलच्या संचालक मंडळावर काम करण्यास बोलावून घेतले. निवडणुक बिनविरोध झाली आणि सर्वांनी एकमताने मला राहूलचा सेक्रेटरी केले.

संस्थेच्या वाटचालीत सर्व सहकाऱ्यांचा पाठिंबा अत्यंत मोलाचा आसतो. मग तो अडचणीच्या वेळी उभे राहण्याचा असो किंवा बिनविरोध निवडणुका करुन सर्वांचा विश्वास संपादित करण्याचा असो. असेच काही प्रसंग आज डोळ्यापुढे आल्याशिवाय राहात नाहीत. एकदा काही गुंतागुंतीच्या प्रकरणात अनेक अडचणींमूळे कारवाई करावी कि करु नये यावर चर्चा चालु होती. आणि मी सर्व कायदेशीर मार्गांचा एकाच वेळी थकित व्यक्तीविरोधात वापर करण्याचा आग्रह धरला. आणि माझ्यावर सर्वांनी विश्वास ठेवुन एकमताने होकार दिला. आणि संस्थेची अडचणीची वसुली होण्यास मदत झाली. याबद्दल मला सर्व संचालक व मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांचा आदर वाटतो. अनेकवेळा सामाजिक,राजकीय लागेबांधे असणाऱ्या थकबाकीदारावर कायदेशीर कारवाई करताना सर्वांनी एकमुखी निर्णय घेऊन संस्थेमध्ये नितिमत्तेचा आर्दश निर्माण करण्यास सहकार्य केले याबद्दल मला त्यांचा सार्थ अभिमान वाटतो.

''एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'' आणि ''सहकार वर्धिते शक्ती'' या सहकारी तत्वांचा मला संस्थेच्या अडचणीच्या काळात एक मोठा अनुभव आला. आम्ही बहुतेक सर्व पदाधिकारी व संचालक लग्नसराईमुळे गावी होतो. संस्थेच्या गावी होतो.संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीमधील रहिवाशी विरुद्ध बिल्डर आणि म्हाडा यांच्यामध्ये सर्वोच्य न्यायालयात खटला चालू होता.आणि दुर्दैवाने खटल्याचा निकाल रहिवाशांच्या विरोधात सकाळी ११ वाजता दिल्ली येथे लागला. आणि दुपारी १२ वाजता बिल्डर आणि म्हाडा प्रशासनाचे अधिकारी पोलिस फौज फाट्यासह डिमॉलिशन स्कॉड घेऊन मुख्य कार्यालयात उभे राहिले. आणि जागा तात्काळ खाली करण्याचे फर्माण जारी केले.सर्व कर्मचारी गोंधळून व घाबरुन गेले.जागा जबरदस्तीने खाली करुन धारावी. येथे ७ व्या मजल्यावर पर्यायी जागेत सर्व सामानासह हलविण्याची जय्यत तयारी बिल्डर व म्हाडा प्रशासनाने केली होती.उपस्थित कर्मचारी व श्री चौधरी साहेब यांनी सर्वांना फोन केले. आणि परिस्थितीची कल्पना दिली. सर्वांनी फोनवरुन एकमेकाशी संपर्क साधून चर्चा केली.आणि सदर परिस्थितीतून मार्ग काढणे करीता श्री दिनेशभाई नाईक,श्री भवानीशंकर शेट्टी साहेब,श्री विठ्ठलशेठ जाधव,श्री चंदूभाई तलाजिया आणि श्री चौधरी साहेब,श्री चिखले यांचेवर जबाबदारी देण्यात आली. आणि या सर्वांनी अक्षरश: संपूर्ण रात्रभर आणि पुढील दोन दिवस पुरेसी झोप न घेता काम केले. श्री. दिनेशभाई नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी संस्थेच्या सामानाची व्यवस्था त्याच बिल्डींगमध्ये कारवाई न झालेल्या खोल्यांमध्ये केली. कोणालाही झोप नव्हती. पूढचे दोन तीन दिवस झोप न घेता कायमस्वरुपी भाड्याच्या जागेकरीता शोध घेत होते. आणि शेवटी योग्य ठिकाणी योग्य डिपॉझीटवर संस्थेला श्री दिनेशभाई नाईक यांच्या प्रयत्नातून पूरेशी जागा मिळाली.

राहूलमध्ये संचालक मंडळावर काम करताना मला माझ्या शिरोली येथे मराठी शाळेची आणि माझे वर्गशिक्षक आदरनिय माळवदकर गुरुजी यांची आठवण नेहमी येते. त्यांनी माझा वर्ग ५ वीला शिकण्यासाठी घेतला आणि तो ७वी फायनलपर्यंत सांभाळला. या तिन वर्षात गुरुजीनी स्वत:ला व आपल्या कुटुंबाला विसरुन फक्त त्यांच्या विद्यार्थांचाच ध्यास घेतला होता, आणि अखेर ७ वीला फायनलचा निकाल १००% लावला होता. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाची, अभिमानाची व तृप्तीची छटा दिसत होती. त्यासाठी ते दिवस रात्र शिरोलीत राबत होते. त्यांच्या विनामोबदला आणि त्यागी वेडाबद्दल मी त्यांना नमस्तक होऊन सलाम करतो. कारण सहकार, सहकार म्हणजे तरी काय असते हे त्यांनी त्यांच्या वृत्तीतून आणि कृतीतून मला दाखवून दिले होते. आणि त्यांचा ठसा माझ्या जिवनावर उमटल्याशिवाय राहीला नाही.

राहुलमधील माझे सहकारी व मला आदरनिय असणारे श्री. सहादूशेठ शेरकर व श्री. शंकरराव भुजबळशेठ यांच्या जिद्दी स्वभावाचा नेहमीच आदर वाटतो. भुजबळशेठ नेहमी म्हणतात की जेव्हा समाजातील काही मंडळी तुम्हाला वेड लागले आहे. असे म्हणतील तेव्हा समजावे की तुम्ही तुमच्या ध्येयप्राप्तीसाठी योग्य मार्गावर चालला आहात. माझा चिकित्सिक स्वभाव, काम करण्याची पध्दत, कामाचा उरक, १००% अचूकता व पूर्णतेचा अट्टहास बँकीग क्षेत्रातील आर्थिक नियमाकरीता आग्रह नियमाप्रमाणे काम करण्याचा सल्ला कायदेशीर बाबींची पूर्तता कारवाईत वक्तशीरपणाचा अट्टाहास यामुळे मला न कंटाळता आजपर्यंत ही मंडळी या वयातही माझ्याबरोबर रात्रीच्या १० वाजेपर्यंत काम करीत असतात.सर्व संचालक मला न कंटाळता एकत्र बसून चर्चेने निर्णय घेण्यात सक्रिय सहभागी होतात.त्यांचे हे सहकार्य मला विसरता येणार नाही.

सद्विवेकबुध्दी, बँकीग क्षेत्रातील कामकरण्याच्या पध्दती, उपविधी, सहकारी कायदा व नियमा अंर्तगत काम करण्याचा माझा अट्टाहास राहुलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आजपर्यंत निमूटपणे आणि सचोटीने अमंलात आणला. त्यामध्ये मुख्य कार्यालयाचे श्री. चौधरीसाहेब, श्री. पिसाळसाहेब (निवृत्त), श्री.संतोष चिखले, श्री. गणेश चौरे सर्व कार्यालयाप्रमुख सर्व कर्मचारी, दैनदिन वसुली प्रतिनिधी आणि संस्थेचे संगणक सहाय्यक श्री. प्रशांत बोरकर यांनी अमूल्य सहकार्य व योगदान या संस्थेमध्ये दिलेली आहे याची आज आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

आपली राहूल संस्था पांरपारिक हस्तलिखीता कडून अद्यावत "कोअर बँकींग" प्रणालीकडे नेताना व केवळ अनुभवातून,प्रेमातून आणि लोकप्रियतेतून सहकारात काम करण्याच्या पद्धतीकडून निकोप अशा सहकाराच्या ७ तत्वांवर आधारीत सहकारी संस्था घेऊन जात असताना संस्थेला ९७व्या घटनादुरुस्तीचा मोठा आधार मिळाला. या वाटचालीत संस्थेला योग्य मार्गावर घेऊन जाण्याकरीता आम्हाला "यशदा" पूणे या प्रशिक्षण केंद्राचे व त्यांच्या सहकार विभाग प्रमुख श्री. महाजन सरांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले. आणि त्याबद्दल मला महाराष्ट्र सरकार यशदा व राहुलच्या संचालकांचा सार्थ आदर वाटतो.

राहूलच्या या प्रवासात माझी पत्नि सौ. कुसुम हिने मला संपूर्ण साथ दिली. इतकेच नाही तर तिने काही काळ संचालक पदाची जबाबदारी देखील पार पाडली. तिच्या प्रापंचिक सोशीक स्वभावामुळेच आज मी सुख-समाधानात आहे यांची आठवण होते.

मागे वळून पाहताना राहुलच्या इतिहासात माझ्या गावचे आराध्य दैवतासमान नेतृत्व दिवंगत कै. निवृत्तीशेठ शेरकर यांनी सांगितलेली व स्वत:च्या वर्तवणुकीतून आणि कतृत्वातून दाखवून दिलेली नितीमूल्ये आजपर्यंत आम्ही सर्वांनी प्रामाणिकपणे जपली व त्यानुसारच वागलो. सहकारी संस्था चालविताना आम्हाला श्रध्दास्थानी असलेले आमच्या गावचे दिवंगत अण्णा म्हणजे कै. सोपानशेठ शेरकर यांनी आम्हाला वेळोवेळी अमूल्य मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे श्री. सुनिल थोरवे साहेब, डेपुटी कलेक्टर यांनी अनेकवेळा आमच्या अडचणी सोडवण्यासाठी मोलाचे सहकार्य केलेले आहे. या सर्वांची आठवण आल्याशिवाय राहात नाही.

राहुलच्या वाटचालीत महत्वाची व जबाबदारीची भुमिका बजाविताना अध्यक्ष श्री. सहादूशेठ शेरकर, जेष्ठ संचालक श्री. शंकरराव भुजबळशेठ, उपाध्यक्ष-श्री.भवानीशंकर शेट्टी साहेब, खजिनदार-श्री.विठ्ठलशेठ जाधव, संस्थेचे मा.महाव्यवस्थापक,सचिव व संचालक, मुंबई बँकेचे मा. उपाअध्यक्ष व संचालक श्री. नितिनबनकरसाहेब, श्री दिनेशभाई नाईक, संचालक श्री. दिपकशेठ थोरवे, श्री. बाळासाहेब एरंडे, श्री. गंगाधर जगताप, श्री. अनिलशेठ सांगळे, कु.हेतल तलजिया, श्री. चंदूभाई तलजिया त्याचप्रमाणे कै. संजयशेठ राऊत, माजी संचालक श्री.संजय भुजबळ, श्री. नागसेन कांबळे, श्री. विजयशेठ थोरवे, सौ.पल्लवी नितिन बनकर या सर्वांनी संस्थेच्या उत्कर्षात अमूल्य योगदान दिलेले आहे. तसेच नवजवान सेवा संघ शिरोली बु.।। चे पदाधिकारी अध्यक्ष श्री. हरिश्चंद्र जगताप, सेक्रेटरी श्री. शिवाजी भि. थोरव, खजिनदार श्री.गणेश शेरकर व दगडू थोरवे व सर्व सभासद या सर्वांनी संस्थेच्या गरुडभरारी मध्ये अमूल्य सहकार्य केलेले आहे. राहूलचे सर्व शाखा समिती सदस्य,सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार,हितचिंतक यांनी संस्थेच्या वाढीसाठी महत्वाची भूमिका बजाविली आहे.

या सर्वांसमवेत काम करीत असताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र चौधरी साहेब, श्री.पिसाळसाहेब(निवृत्त)वसुली अधिकारी कर्जविभाग प्रमुख श्री.संतोष चिखले,संगणक प्रमुख श्री.गणेश चौरे सर्व शाखांचे कार्यालय प्रमुख, सर्व लिपिक कर्मचारी तसेच संस्थेचे सर्व दैनंदिनी वसुली प्रतिनिधी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले याचा मला खूप आनंद होत आहे.त्यांनी सर्वांनी माझ्यावर प्रचंड विश्वास दाखवून पारंपारिक पतसंस्थेच्या कारभार पध्दतीतून आधुनिक कोअर बँकीग सोल्युशन प्रणालीकडे व ९७ व्या घटना दुरुस्तीला अभिप्रेत असलेल्या निकोप सहकारी चळवळीत आधारित बँकीग क्षेत्रातील धोरणे आर्थिक परिमाणे प्रत्यक्षात राबवून खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीकडे संस्थेला नेताना अहोरात्र मेहनत घेतली. माझ्या सूचनांची,विचारांची आणि कल्पानांची अंमलबजावणी करताना कोठेही कोणतिही कमतरता दाखविली नाही. व माझ्यावर विश्वासाचे प्रचंड उपकार करुन ठेवले त्यांची उतराई मला कधीही करता येणार नाही.

आपला संसार आपला परिवार कसा असावा व तो कसा चालवावा याचा प्रत्येक्ष व आदर्श असा अनुभव मला राहुलने दिला. सर्वांनी आनंदाने बरोबर घेऊन आपण सामाजिक व संस्थेचा विकास करु शकतो याचा आत्मविश्वास मला राहुलमुळे मिळाला त्याबद्दल मी राहूलच्या सर्व संचालक, सर्व शाखा समिती सदस्य, अधिकारी, कर्मचारी, दैनंदिन वसूली प्रतिनिधी, सर्व सभासद ठेविदार, कर्जदार व हितचिंतक यांचा सदैव ऋणी राहील.

*जय हिंद !*

*जय महाराष्ट्र !!*

*जय सहकार !!!*

**श्री बाजीराव शंकर थोरवे**

सेक्रेटरी